साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

# विपश्यना

साधक (मराठी)

**बुद्धवर्ष 2566, मार्गशीर्ष पौर्णिमा, 8 डिसेंबर, 2022 वर्ष 6 अंक 9**

**वार्षिक शुल्क** रु. 100/- मात्र (भारताबाहेर पाठविण्यासाठी US $ 50)

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx

## धम्मवाणी

**किञ्चापि सो कम्मं करोति पापकं, कायेन वाचा उद चेतसा वा।**
**अभब्बो सो तस्स पटिच्छदाय, अभब्बता दिट्ठपदस्स वुत्ता।**
**इदम्पि सङ्घे रतनं पणीतं, एतेन सच्चेन सुवत्थि होतु॥**

*– खु.नि., खुद्दकपाठपालि-6-12, रतनसुत्तं.*

(स्रोतापन्न अवस्थेवर पोहोचलेल्या परमपद द्रष्ट्या साधकाने) जर कधी काया, वाणी किंवा चित्ताने कोणते पापकर्म केले तरी तो त्याला लपवू शकत नाही. (भगवानांद्वारे) म्हटले गेले आहे की निर्वाणाचा साक्षात्कार करणाऱ्या (व्यक्ती) साठी (आपल्या दुष्कृत्याला गोपनीय ठेवू शकणे अशक्य आहे). खरोखरच! हे देखील श्रेष्ठ रत्नत्व आहे आर्य श्रावक-संघामध्ये. या सत्य कथनाच्या प्रभावाने स्वस्ति होवो! (मंगल होवो!!)

## महामानव बुद्ध चित्रावलीच्या पुस्तकातून साभार

महामानव बुद्धांद्वारे शिकवल्या गेलेल्या विपश्यना साधनेशी संबंधित चित्रावलीला "विश्व विपश्यना पगोडा", गोराई, मुंबईच्या विशाल दर्शक-दीर्घिकेमध्ये (आर्ट-गॅलरीमध्ये) दर्शविले गेले आहे. या चित्रांच्या कथा पूज्य गुरुदेवांनी स्वत: लिहिल्या/रचल्या आणि यांच्या आधारावर भारतीय चित्रकार श्री कामत यांनी त्यांना कागदावर रेखांकित करून पूज्य गुरुजींच्या स्वीकृतीने जी चित्रे चितारली, ती पूज्य गुरुजींच्या आमंत्रणावर आलेल्या बर्मी कलाकारांनी दीर्घकाळापर्यंत 'विश्व विपश्यना पगोडा' च्या प्रांगणात राहून कॅनव्हासवर उतरविली. या चित्रांचे पूर्ण कथानक तिथे उपलब्ध असलेल्या एका श्रवण-यंत्राद्वारे दर्शक इच्छित चित्राच्या समोर उभे राहून ऐकू शकतात. या चित्रांची पुस्तके कित्येक भाषांमध्ये उपलब्ध आहेत. त्यातीलच काही कथानके साधकांच्या प्रेरणार्थ (चित्राशिवाय) इथे प्रस्तुत करीत आहोत.

— संपादक

## यशोधरा

यशोधरेची गुणवत्ता भगवानांपासून अज्ञात नव्हती. त्यामुळे ते स्वत: तिच्या निवासस्थानाच्या शयनकक्षामध्ये गेले. दोन्ही अग्रश्रावक सारिपुत्र आणि मौद्गल्यायन यांनाही आपल्यासोबत घेऊन गेले. महाराज शुद्धोदनही त्यांचे भिक्षापात्र घेऊन त्यांच्याबरोबर गेले. भगवानांनी आपल्या दोन्ही प्रमुख शिष्यांना म्हटले की राजकन्या यशोधरा तिच्या इच्छेनुसार ज्या कोणत्याही प्रकाराने त्यांचे वंदन करेल, तिला त्यांनी रोखू नये.

कोणतीही स्त्री एका गृहत्यागी श्रमणाच्या अथवा कोणा अरहंत पुरुषाच्या शरीराला स्पर्श करू शकत नाही. त्याच्या चरणांनाही नाही. आणि हे तर साधारण श्रमणच नाहीत, अरहंतही नाहीत, तर सम्यक संबुद्ध आहेत. कोणतीही स्त्री, भले त्यांची पूर्व पत्नी का असेना, त्यांच्या शरीराला स्पर्श कसा करू शकते? त्यांच्या चरणांनाही स्पर्श करू शकत नाही. परंतु महाकारुणिक भगवानांच्या मनात असीम मैत्रीचे कारंजे उसळले. देवी यशोधरा आली आणि भगवानांच्या समोर बसून तिने त्यांचे चरण पकडून मनासारखी वंदना केली. कोणीही त्यात बाधा उत्पन्न केली नाही.

यावर महाराज शुद्धोदनाने देवी यशोधरेच्या गुणवत्तेचे संक्षेपात वर्णन केले. त्यांनी सांगितले की —

1. जेव्हा राजकुमार सिद्धार्थने घर-गृहस्थीचा त्याग केला आणि त्याच्या परतण्याची कोणती शक्यता राहिली नाही, तेव्हा राजवंशाच्या अनेक राजकुमारांनी या परित्यक्ता युवतीबरोबर नवा संबंध जोडण्याचा प्रस्ताव ठेवला. परंतु माझ्या मुलीने त्यांच्याकडे नजर वर उचलूनही पाहिले नाही.

2. माझ्या मुलीने जेव्हा ऐकले की तुम्ही श्रमण वेश धारण करून मुंडण केले आहे, तेव्हापासून तिनेही आपल्या डोक्याचे मुंडण करवून घेतले.

3. जेव्हापासून ऐकले की तुम्ही सर्व राजसी वस्त्रालंकारांचा त्याग करून गेरुच्या रंगाचे वस्त्र धारण केले आहे, तेव्हापासून तिनेही मुलायम राजसी वस्त्रालंकारांचा त्याग करून, रूक्ष गेरुच्या रंगाचे वस्त्र धारण केले.

4. जेव्हापासून ऐकले की तुम्ही एक वेळच भोजन ग्रहण करत आहात, तेव्हापासून ती देखील एकाहारी झाली.

5. जेव्हापासून ऐकले की तुम्ही उच्च आरामदेही पलंगावर झोपणे त्यागले आहे, तेव्हापासून ती देखील खाली मंचकावर झोपू लागली.

6. जेव्हापासून ऐकले की तुम्ही माळा, गंध, विलेपन धारण करणे त्यागले आहे, तेव्हापासून तिने यांना स्पर्शही केला नाही.

7. जेव्हापासून ऐकले की तुम्ही नृत्य, गीत, वादन इत्यादी ऐंद्रिय सुखांना त्यागले आहे, तेव्हापासून तिनेही यांच्याकडे पाठ फिरवली आहे.

असे तर होणारच होते.

नासमज तसेच विरोधी तत्वांनी अशा त्यागमयी सती साध्वी आदर्श पतिपरायणा गृहिणीच्या संबंधातही अनेक मनोरचित गोष्टी जोड-जोडून पसरवून दिल्या, ज्यांचा उद्देश राजकुमार सिद्धार्थला नितांत निष्ठुर आणि निर्दयी ठरवणे हा होता— जसे की त्याने आपल्या पत्नीला न सांगता गुपचूप गृहत्याग केला. आपल्या असहाय्य पत्नीला विलाप करण्यासाठी सोडून दिले.पतीच्या उत्तरदायित्वापासून पूर्णपणे विमुख झाला. आपल्या नवजात शिशुच्या प्रति असलेले सारे दायित्व पत्नीवर सोडून पळून गेला. अशा रीतीने यशोधरेच्या पात्राला माध्यम बनवून राजकुमार सिद्धार्थची निंदा करणे हेच त्यांचे प्रमुख लक्ष्य राहिले.

तसे पाहिले तर पतीद्वारे त्यागले गेल्यावर यशोधरेला दु:ख झालेच नाही, असे म्हणणेही चुकीचे होईल. पण जी अतिरंजना निंदकांनी पसरवली, ती तथ्यहीन आहे. विशाल त्रिपिटक साहित्यात असे वर्णन कुठेही नाही की सिद्धार्थने गृह त्याग केल्यावर यशोधराने विलाप केला. केवळ त्याच्या पित्याला आणि मावशीलाच अश्रुमुख होऊन विलाप करताना पाहिले जाते. यशोधरेला आपल्या प्रिय पतीच्या प्रति विपुल श्रद्धा होती, भक्ती होती, विश्वास होता.

हे म्हणणे चुकीचे ठरेल की सिद्धार्थने एकाएकी घर त्यागण्याचा निर्णय घेतला व याची यशोधरेला तीळमात्रही कल्पना नव्हती. हे खरे आहे की घर सोडतेवेळी झोपलेल्या यशोधरेला जागे करून सूचित केले नाही. कारण स्पष्ट होते. यशोधरेने विलाप करत जरी विरोध केला नसता तरी शिशु राहुलचे जागे होणे स्वाभाविक होते. त्याच्या रडण्याचा आवाज ऐकून घरातील इतर लोकांचे, विशेष करून महाराज शुद्धोदन आणि महाप्रजापतीच्या जागे होण्याची आशंका स्पष्ट होती. अशा अवस्थेत गृहत्याग करणे कठीण झाले असते.

परंतु यशोधरेसाठी सिद्धार्थाच्या गृहत्यागाची घटना अघटित नव्हती. दोघे एकाच दिवशी जन्मले होते. त्यामुळे समवयस्क होते. दोघे सोळा वर्षांच्या वयात दाम्पत्य जीवनात बांधले गेले होते. दोघांनी तेरा वर्षांपर्यंत एकत्र राहून सुखी दाम्पत्य जीवन व्यतीत केले होते. दोघांचे एकमेकांवर प्रेम होतेच. तेरा वर्षांच्या दाम्पत्य जीवनात कधी दोघांचे भांडण झाले, एकमेकांसोबत पटले नाही, असे वर्णन कुठे पहायला मिळत नाही. त्यामुळे पत्नीशी भांडून अथवा तिला कंटाळून घर त्यागले, असे म्हणणे धादांत खोटे होईल.

तेरा वर्षांपर्यंत सुखपूर्वक एकत्र राहणारे तरुण पती-पत्नी एकमेकांच्या मनोवृत्तीला चांगल्या प्रकारे समजणारे होते. एकमेकांच्या विचारधारेपासून अनभिज्ञ नव्हते. हे तथ्य दोघांपासून अज्ञात नव्हते की ज्योतिष्यांच्या भविष्यवाणीनुसार आणि शरीरावर असलेल्या 32 महापुरुष लक्षणांच्या अनुसार जर सिद्धार्थ गृहस्थ राहिला तर तो चक्रवर्ती सम्राट होईल आणि गृहत्यागी झाला तर सम्यक संबुद्ध होईल. हे देखील त्यांच्यापासून अज्ञात राहिले नसेल की राज्य-ज्योतिष्यांमधून केवळ एकाचेच नाही, तर परिवाराचे राजपुरोहित ऋषी काल (असित) देवल यांचेही हेच मत होते की हा सम्राट नाही, तर सम्यक संबुद्धच होईल.

29 वर्षांचे वय पोरकटपणाचे नसते. दोघे समजदार होते. या गंभीर विषयावर परस्पर चर्चा अवश्य होत राहिली असावी. राजकुमार सिद्धार्थच्या मनात चक्रवर्ती सम्राट बनण्याचे कोणतेही आकर्षण नव्हते. तो सम्यक संबुद्ध बनू इच्छित होता. त्याची ही मनोदशा आणि कल यशोधरेपासून लपला नव्हता.अवश्य राजकुमार सिद्धार्थ हा तर्क प्रस्तुत करत राहिला असावा की चक्रवर्ती सम्राट बनून मी लोकांचे किती भले करु शकेन? जेव्हा की सम्यक संबुद्ध बनून केवळ आपल्या स्वत:लाच मुक्त नाही करणार, तर आपल्या परिवाराला तसेच इतर अगणित प्राण्यांना भवसंसरणाच्या दु:खांमधून पूर्णपणे मुक्त होण्यात सहाय्यक बनू शकेन.

या लोक कल्याणकारिणी मनोवृत्तीच्या विरुद्ध काय तर्क असू शकतो भले? यशोधरेने या जनकल्याणी विचारधारेचा काय विरोध केला असता? का विरोध केला असता? कल्पांपूर्वी जेव्हा सिद्धार्थ गौतमने तापस सुमेधच्या रूपात भगवान दीपंकर सम्यक संबुद्धांकडून आशीर्वाद प्राप्त केला होता की तो पुढे जाऊन सिद्धार्थ गौतमच्या नावाने सम्यक संबुद्ध होईल, तेव्हा यशोधरानेही तत्कालीन ब्राह्मणकन्येच्या रूपात त्यांच्याकडून हाच आशीर्वाद प्राप्त केला होता की ती जन्म-जन्मांतरांमध्ये धर्मपत्नी बनून याची साथ देईल. आता या दोघांचा हा अंतिम जन्म होता. ती जर त्याची पत्नी बनली आहे तर सम्यक संबुद्ध बनण्यात सिद्धार्थ गौतमची साथ कशी नाही देणार?

यशोधराची पूर्वकाळाची ही पृष्ठभूमी नसती आणि तिच्या मनाच्या गाभाऱ्यात भगवान दीपंकरांची भविष्यवाणी आणि आशीर्वादाचे पावन बीज नसते, तर मग तिने पतीने त्यागल्यावर एका साधारण गृहिणीप्रमाणे विलाप केला असता. आपल्या पळपुट्या पतीला कोसले असते. आपल्या शृंगाराचा त्याग केला नसता उलट अत्यंत सुंदर, रूपवती राजकन्या असल्यामुळे कोणा अन्य राजकुमाराला निवडून पुनर्विवाह केला असता आणि सांसारिक सुखाचे जीवन जगली असती.

परंतु यशोधरा तर जन्मो-जन्मीची धर्मसंगिणी होती. असे कसे केले असते तिने भले? ती खूप चांगले समजून होती की कोणत्या महान उद्देशाकरीता पतीने घर सोडले आहे. विलाप करण्याच्या ऐवजी ती त्यांच्या सफलतेची मंगल कामनाच करीत राहिली.

पुढे जाऊन यशोधरा, महाप्रजापतीबरोबर भगवानांना भेटून भिक्षुणी संघाच्या स्थापनेत सहाय्यक झाली. अनेक दु:खी स्त्रियांना संघात संम्मिलित करवून त्यांच्या कल्याणात सहाय्यक झाली. स्वत: तर भवमुक्त अरहंत अवस्था प्राप्त करून आपले जीवन सफल केलेच, अनेकांना या मार्गावर चालण्याची प्रेरणा प्रदान केली. अशी धर्ममयी होती राहुल-माता यशोधरा.

----------

## राहुल

महालाच्या व्हरांड्यात लाडक्या राहुलबरोबर उभ्या असलेल्या राहुलमाता यशोधराने समोर राजपथावर श्रमणसंघाबरोबर चालणाऱ्या त्याच्या पित्याचा अर्थात भगवान बुद्धांचा त्याला परिचय करून दिला :—

***एस हि तुय्ह पिता नरसीहो,***

पहा! हे जे नरांमध्ये सिंहासमान आहेत, हेच तुझे पिता आहेत.

***आयतयुत्तसुसण्ठितनासो,***

पहा! यांची नासिका किती लांब आणि सुडौल आहे.

***गोपखुमो अभिनीलसुनेत्तो,***

यांचे डोळे सुंदर निळ्या रंगाचे आहेत आणि डोळ्यांच्या पापण्या हरणाच्या पाडसासारख्या आहेत.

***इन्दधनू अभिनीलभमुको,***

यांच्या श्यामवर्णी भुवया इंद्रधनुष्याच्या आकृतीसमान आहेत.

***वट्टसुवट्ट-सुसण्ठित-गीवो,***

यांची मान गोलाकार आहे, सुगठित आहे.

***सीहहनू मिगराजसरीरो,***

यांची हनुवटी सिंहासारखी आहे. हेच नाही, तर यांचे सारे शरीर सिंहासारखे आहे.

***कञ्चनसुच्छविउत्तमवण्णो,***

यांच्या शरीराची सुंदर छबी सुवर्णासमान उत्तम वर्णाची आहे.

***अञ्जनवण्णसुनीलसुकेसो,***

यांचे सुंदर केस सुरम्याप्रमाणे काळे आहेत.

***कञ्चनपट्टविसुद्धनलाटो,***

यांचे ललाट विशुद्ध सोन्याच्या पट्ट्याप्रमाणे आहे,

***ओसधिपण्डरसुद्धसुउण्णो,***

यांच्या भुवयांच्या मधील केस, औषधी तारेसमान फिक्कट पिवळ्या रंगांचे आहेत.

***पुण्णससङ्कनिभो मुखवण्णो,***

यांचा मुख-वर्ण आकाशात चमकणाऱ्या पौर्णिमेच्या चंद्रासारखा आहे.

***देवनरान पियो नरनागो,***

हे नररूपी गजराज मनुष्यांना आणि देवतांना प्रिय आहेत.

***खत्तियसम्भवअग्गकुलीनो,***

हे अग्र क्षत्रिय कुळात जन्मले आहेत.

***देवमनुस्सनमस्सितपादो,***

सर्व देव मनुष्य यांच्या चरणांची वंदना करतात.

***सीलसमाधिपतिट्ठितचित्तो,***

कारण यांचे चित्त शील-समाधिमध्ये भल्या प्रकारे प्रतिष्ठित आहे.

***गच्छतिनिलपथे विय चन्दो, तारगणापरिवेठितरूपो।***

ज्या प्रकारे आकाशमार्गात तारकांनी घेरलेला चंद्रमा गतिमान असतो,

***सावकमज्झगतो समणिन्दो,***

त्याच प्रकारे आपल्या श्रमण श्रावकांनी घेरलेले गतिमान आहेत.

***लोकहिताय गतो नरवीरो,***

जे नरांमध्ये वीर आहेत, ज्यांनी लोकहितासाठी गृह त्याग करून गमन केले आहे.

***एस हि तुम्ह पिता नरसीहो।***

असे आहेत हे तुझे पिता, नरांमध्ये सिंहासमान.

*— (विनयपिटक, सारत्थदीपनी टीका 3-105, राहुलवत्थुकथावण्णना)*

ज्या प्रसन्नचित्ताने यशोधरेने आपल्या पूर्व पतीचा परिचय पुत्र राहुलला करून दिला, त्यातून आपण पाहतो की पतीच्या गृहत्यागाचा तिच्या मनात ना रोष आहे, ना क्षोभ. उलट श्रद्धा आणि गर्व आहे की ज्या लोकहितार्थ गृहत्याग केला, त्यात ते सफल झाले आहेत आणि लोक कल्याणात लागले आहेत. तिला असे वाटत आहे की तिच्या पुत्राच्या मनातही हा भाव जागावा. त्यासाठी असा योग्य आणि गरिमामयी परिचय करून दिला.

----------

## राहुलची प्रव्रज्या

ममतामयी माता यशोधराने त्याच्या पित्याचा परिचय देऊन आणि ओळख सांगून पुत्र राहुलला म्हटले— "जा, आपल्या पित्याला भेट आणि त्यांच्याकडून आपली विरासत माग. त्यांच्याजवळ स्वर्णरत्नांनी भरलेले चार घडे आहेत."

स्वर्णरत्नांनी भरलेले कोणते चार घडे होते? ही जी चार आर्यसत्ये आहेत, जी स्वर्णरत्नांपेक्षा कितीतरी अधिक मूल्यवान आहेत, जी वस्तुत: अनमोल आहेत.

तेव्हाच म्हटले गेले—

**यं किञ्चि वित्तं इध वा हुरं वा, सग्गेसु वा यं रतनं पणीतं।**

**न नो समं अत्थि तथागतेन, इदम्पि बुद्धे रतनं पणीतं॥**

*— (खुद्दकपाठपालि- 6-3, रतन-सुत्तं)*

— जी काही धन-संपत्ती इथे या लोकात आहे, अथवा तिथे इतर लोकांमध्ये आहे आणि स्वर्गातही जी उत्तम रत्न-संपत्ती आहे, त्यातून कोणाचीही तिच्याशी तुलना होऊ शकत नाही, जी तथागतांमध्ये आहे. बुद्धांमध्ये जी रत्ने आहेत ती अतुल्य आहेत, अनमोल आहेत.

बुद्धांमध्ये या चार आर्यसत्यांचे अनमोल रत्न आहे की जे त्यांनी स्वत: अर्जित केले आहे, ज्याला ते लोकांना वाटत आहेत. यावर तुझा अधिकार आहे. तू यांचा वारस आहेस. ही तुझी विरासत आहे. जा, माग त्यांच्याकडे.

यशोधरा मनातल्या-मनात विचार करते, "मी देखील या अनमोल रत्नाची विरासत प्राप्त करेन. परंतु काही कारणांमुळे बुद्धांनी अजून भिक्षुणीसंघाची स्थापना केलेली नाही. जेव्हा कधी करतील तेव्हा मीही प्रव्रजित होऊन त्यांच्या चरणचिन्हांचे अनुगमन करत चालू लागेल आणि आपल्या स्वत:चा उद्धार करून त्यांच्या 'लोकहिताय' अभियानात सहभागी होईन. माझा लाडका इथे राजमहालाच्या वैभव-विलासात वाढून काय प्राप्त करेल? आपल्या पित्याच्या कल्याणी छत्रछायेत वाढला तर सद्धर्माचे अनमोल रत्न प्राप्त करेल. जीवन सफल करेल. हा विचार करत-करत, तिने आपल्या लाडक्याला निरोप देत म्हटले, "जा, मुला! आपल्या पित्याकडे विरासत माग!"

राहुल प्रसन्नचित्ताने भगवानांजवळ पोहोचला. पोहोचताक्षणीच त्याला इतक्या सुखद शांतीचा आणि शीतलतेचा अनुभव झाला की आपोआपच त्याच्या तोंडून हे शब्द बाहेर पडले—

"***सुखा ते, समण, छाया'ति***। — श्रमण, तुझी सावली सुखद आहे."

भगवानांची छत्रछाया कोणाला सुखद वाटली नसती? त्यांच्या सान्निध्यात सारे पाप-ताप दूर होऊन जातात. पुत्राने पित्याची अशी सुखद शांतिप्रद छत्रछाया प्राप्त केली. पित्याने पुत्राला धर्मरत्नमयी अनमोल विरासत दिली. त्याला सारिपुत्रच्या हवाली करून, तिथेच प्रव्रज्या देण्यात आली.

धर्ममय वातावरणात राहून राहुल मोठा झाला आणि विपश्यना साधना शिकून घेऊन, अभ्यास करत-करत त्याने अरहंत अवस्था प्राप्त केली. धन्य झाला राहुल! धन्य झाली राहुलला मिळालेली अनमोल विरासत!

कल्याणमित्र,
सत्य नारायण गोयंका

---

## प्रश्नोत्तरे- सतिपट्ठान शिबिरातील

**प्रश्नः** कलाप (भौतिक पदार्थाचा सर्वात लहान अविभाज्य कण) कुठून उत्पन्न होतात आणि ते कशात नष्ट होतात? काही नाही पासून तर काही उत्पन्न होऊ शकत नाही?

**श्री गोयंकाजी:** ब्रह्मांडाची सुरुवात कुठून झाली आणि कशी झाली, हे सर्व अंदाज आहेत, जिथून सर्व दार्शनिक मान्यता सुरु होतात. बुद्धांनी त्यांना अप्रासंगिक प्रश्न म्हटले आहे. त्यांचे दुःख, त्याचे उत्पन्न होणे, त्याचे उन्मूलन आणि त्याच्या उन्मूलनाच्या मार्गाशी काही घेणे-देणे नाही. सृष्टी प्रत्येक क्षणी चालत राहिली आहे, कल्प बनत चालले आहेत, ते उत्पन्न होत आहेत आणि नष्ट होत आहेत, आणि उत्पन्न आणि नष्ट होण्याची अज्ञानताच दुःखांना जन्म देत असते. बाकी सर्व अर्थहीन आहे. मानवी जीवन खूप लहान आहे आणि आपल्याजवळ इतके मोठे काम आहे— आपल्या अंतर्मनाच्या सवयीला सर्वात तळस्पर्शी स्तरावर बदलून दुःखांपासून पूर्ण मुक्ती मिळवणे. म्हणून वेळ व्यर्थ घालवू नये, काम करावे. तेव्हाच आपल्या स्वत:च्या अनुभूतीने वास्तविक सत्याचे दर्शन होईल.

**प्रश्नः** मन आणि भौतिक पदार्थाच्या या संसाराच्या अस्तित्वामागे काय कारण आहे?

**श्री गोयंकाजी:** अविद्याच संस्कार (मानसिक प्रतिक्रिया, मानसिक स्वभाव) उत्पन्न करत असते, आणि संस्कार अविद्येचे संवर्धन करतात. यांच्या परस्पर सहयोगानेच सारे ब्रह्मांड बनले आहे, आणखी काही नाही.

**प्रश्नः** अज्ञानतेची सुरुवात कशी झाली? ही प्रेम, विद्या आणि ज्ञानाच्या बरोबर सह-अस्तित्वात होऊ शकत नव्हती?

**श्री गोयंकाजी:** जरूर, पण या क्षणाच्या अज्ञानतेला पाहणे आणि शुद्धता प्राप्त करणे अधिक महत्त्वपूर्ण आहे. नाहीतर हा एक दार्शनिक प्रश्न बनून जातो, जो मदत करत नाही.

*(श्री सत्यनारायण गोयंकाजींद्वारे सतिपट्ठान शिबिर, दिवस सातच्या प्रश्नोत्तरांमधून साभार)*

---

## ऑनलाइन भावी शिबिर कार्यक्रम व आवेदन

सर्व भावी शिबिरांची माहिती नेटवर खालील लिंक्स वर उपलब्ध आहे. सर्व प्रकारचे बुकिंग केवळ ऑनलाईन होत आहे. म्हणून आपल्याला निवेदन आहे की खालील लिंक वर चेक करा आणि आपल्याला उपयुक्त शिबिरासाठी अथवा सेवेसाठी सरळ ऑनलाईनच आवेदन करावे.

https://www.dhamma.org/en/schedules/schgiri

**विश्वभरातील सर्व भावी शिबिरांची माहिती व आवेदनासाठी:**

https://schedule.vridhamma.org एवं www.dhamma.org

**व खालील लिंक पहावी**

https://www.dhamma.org/en-US/locations/directory#IN

---

## अति महत्वपूर्ण सूचना

सेंट्रल आईवीआर (इंटरैक्टिव्ह वॉयस रिस्पॉन्स) संभाषण नंबर- ०२२-५०५०५०५१ अर्जदार या नंबरवर आपल्या नोंदवलेल्या मोबाईल नंबर (फॉर्म मधील उल्लेखित नंबर) ने आपली शिबिर नोंदणीची स्थिती तपासण्यासाठी, रद्द करण्यासाठी, स्थानांतरीत करण्यासाठी अथवा कुठल्याही सेंटरवर नोंदणी केलेल्या आपल्या अर्जाची पुष्टी करण्यासाठी कॉल करू शकतात. ते या सिस्टीमद्वारे केंद्राशी सुद्धा संपर्क करू शकतात. हा भारताच्या सगळ्या विपश्यना केंद्रांसाठी एक केंद्रीय संपर्क नंबर आहे.

## मुंबई महानगर क्षेत्रात विपश्यना संबंधी कार्यक्रम

मुंबई महानगर तसेच आसपासच्या क्षेत्रांमध्ये अनेक विपश्यना केंद्र आणि ध्यानाच्या सुविधा उपलब्ध आहेत. याविषयी सविस्तर माहितीसाठी कृपया खाली दिलेली लिंक पहावी: https://mumbai.vridhamma.org/

अशाच प्रकारे **संपूर्ण भारतात 1 - दिवसीय शिबिर आणि सामूहिक साधनेसाठी** कृपया या लिंकवर क्लिक करून पहावे: *https://www.vridhamma.org/1-day-Courses-Information-in-India*

### अतिरिक्त उत्तरदायित्व

1. श्री विनोद वतनी, (व.स.आ.), धम्म अजन्ता, औरंगाबादसाठी केंद्र आचार्यांच्या रूपाने सेवा

### नवे उत्तरदायित्व
### आचार्य

1. श्री ए. सुब्रमनियम, चेन्नई

### वरिष्ठ सहायक आचार्य

1. श्री शिवराम संपत वाघ, जळगांव

### नव नियुक्ती
### सहायक आचार्य

1. श्री सुरेश वैरागडे, रायपुर
2. श्री विशाल कांबळे, सातारा
3. डॉ. अपेक्षा खोब्रागडे, नागपुर
4. श्री कल्पेश पटेल, महेमदाबाद (गुजरात)
5. श्री रतनशीभाई पटेल, नवसारी (द. गु.)
6. श्रीमती संगिता ताजी, जालना
7. श्री गोविंद सभय, राजकोट
8. श्री अविनाश चिंचोलिकर, औरंगाबाद
9. श्री बिशका चकमा, मिजोरम
10. श्री मोहन रामचंद्रन, चेन्नई
11. श्री सिद्धार्थ सोनकांबळे, कच्छ
12. श्री सुनिल कुलकर्णी, नांदेड
13. श्री शाम आठवले, अकोला
14. श्री सुनिल कुमार सिन्हा, बिहार
15. डॉ. इला ठकरार, सुरत

### बालशिबिर शिक्षक

1. श्री एस. के. कुमारन, मदुराई
2. श्री एम. गणेशन, मदुराई
3. श्री एम. सुधाकर, चेन्नई
4. श्रीमती आनंदवल्ली, चेन्नई
5. श्रीमती सावरी प्रसन्ना साइमन, चेन्नई
6. श्रीमती राजेश्वरी ए., चेन्नई
7. श्रीमती गौतमा मीना, चेन्नई
8. Ms. Natratamon Kaweera, Thailand
9. Mr. Yuichiro Harada, Japan

## ग्लोबल विपश्यना पगोडा, गोराई, मुंबईमध्ये

### 1. एक दिवसीय महाशिबिर (Mega Course) कार्यक्रमः

1. रविवार- 15 जानेवरी, 2023 पूज्य माताजींच्या पुण्यतिथी (5 जान.) तसेच सयाजी ऊ बा खिन यांच्या पुण्यतिथी (19 जान.) च्या निमित्ताने.
2. **रविवार**- 07 मे, 2023 बुद्ध-पौर्णिमेच्या निमित्ताने.
3. रविवार- 02 जुलै, आषाढ़-पौर्णिमे (धम्मचक्कपवत्तन दिवस) च्या निमित्ताने.
4. रविवार 01 ऑक्टोबरला शरद-पौर्णिमा तसेच पूज्य गोयन्काजींच्या पुण्यतिथी निमित्ताने.

### 2. एक दिवसीय शिबिर प्रतिदिन

याच्या व्यतिरिक्त विपश्यना साधकांसाठी पगोडामध्ये रोज एक दिवसीय शिबिरेआयोजित केली जात आहेत. कृपया भाग घेण्याकरीता खाली दिलेल्या लिंकचे अनुसरण करावे आणि एका मोठ्या समूहात ध्यान करण्याच्या अपार सुखाचा लाभ घ्यावा— **समग्गानं तपोसुखो**। संपर्क : 022 50427500 (Board Lines) - Extn. no. 9, मो. +91 8291894644 (सकाळी 11 पासून सायं. 5 वाजेपर्यंत). (रोज 11 ते 5 वाजे पर्यंत)

Online registration: http://oneday.globalpagoda.org/
register Email: oneday@globalpagoda.org

सूचनाः कृपया पिण्याच्या पाण्याची बाटली आपल्यासोबत आणावी आणि पगोडा परिसरात पाणी भरून आपल्यासोबत ठेवावी.

**'धम्मालय' विश्राम गृहः** एक दिवसीय महाशिविरासाठी येण्यासाठी रात्री 'धम्मालय' मध्ये विश्रामाची सुविधा उपलब्ध आहे. अधिक माहिती आणि बुकिंगसाठी संपर्कः 022 50427599 or email- info.dhammalaya@globalpagoda.org

इतर कोणत्याही प्रकारच्या माहितीसाठी संपर्कः
info@globalpagoda.org or pr@globalpagoda.org

## दोहे धर्माचे

बुद्ध रत्ना सम च जगती, अन्य रत्न ना कोय।
सत्य च वचन तेजाने, धर्म प्रकाशित होय॥
धर्म रत्ना सम च जगती, अन्य रत्न ना कोय।
सत्य च वचन तेजाने, धर्म प्रसारित होय॥
संघ रत्ना सम च जगती, अन्य रत्न ना कोय।
सत्य च वचन तेजाने, धर्म प्रतिष्ठित होय॥
तीन रत्नात दडलेले, धर्म रत्न रे जाण।
धर्म विना ना बुद्ध रे, ना च संघ हे जाण॥

## दोहे धर्माचे

संबुद्धा तुझ्या बोधिचा, कसा' च मंगळ घोष।
झोपलेल्यास जाग रे, मदहोशीस च होश॥
बोधि महा महिमामयी, माती सुवर्ण होय।
खड्याचा होई हिरा, दगडच पारस होय॥
जागे बोधी च चित्तात, दूर होई अज्ञान।
बुद्ध रत्नाच्या शरणाची, हीच खरी रे जाण॥
बोधी रत्नाने च मिळे, शुद्ध बुद्ध रे सोय।
सत्य च वचन तेजाने, बहुजनांचे हित होय॥

"विपश्यना विशोधन विन्यास" साठी प्रकाशक, मुद्रक व संपादकः राम प्रताप यादव, धम्मगिरी , इगतपुरी- 422 403, दूरध्वनीः (02553) 244086, 244076·
मुद्रण स्थान : अपोलो प्रिंटिंग प्रेस, 259, सीकॉफ लिमिटेड, 69 एम. आय. डी. सी, सातपुर, नाशिक-422 007. बुद्धवर्ष 2566, मार्गशीर्ष पौर्णिमा, 8 डिसेंबर, 2022

वार्षिक शुल्क रु. 100/-, US $ 50, (भारताबाहेर पाठविण्यासाठी) रजि. नं. MAHMAR/2017/72685. Postal Regi. No. NSK/286/2021-2023

Posting day- **Purnima of Every Month**, Posted at **Igatpuri-422 403**, Dist. Nashik (M.S.) (किरकोळ विक्री होत नाही)
**DATE OF PRINTING: 25 NOVEMBER, 2022, DATE OF PUBLICATION: 08 DECEMBER, 2022**

If not delivered please return to:-
**विपश्यना विशोधन विन्यास**
**धम्मगिरी, इगतपुरी - 422 403**
**जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत**
**फोन : (02553) 244076, 244086, 244144, 244440.**
Email: vri_admin@vridhamma.org;
Course Booking: info.giri@vridhamma.org
Website: www.vridhamma.org